वर्ष : ०५ | अंक: ४८ | मुंबई, मंगळवार २२ ऑक्टोबर २०१९ ते सोमवार २८ ऑक्टोबर २०१९ | पृष्ठ: ४

पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021


WeWite: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 १० बोगस जामिनदार 'गोत्यात'

3 गलबला उदंड झाला!

इमानदारांच्या पैशांवर टाच येऊ देणार नाही ← 4



# राज्यात ६०.५० टक्के मतदान

## कोण रचणार इतिहास ?

### तुरळक हिंसा, पावसाच्या व्यत्ययामुळे मतदानाचा टक्का घसरला



**मुंबई - संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या राज्य विधानसभा निवडणुकीसाठी झाले. सहा वाजेपर्यंत ६०.५० टक्के मतदान झाल्याचे समजते. राज्यातील अनेक भागांत कोसळणाऱ्या पावसामुळे निवडणूक यंत्रणांना रविवारी दिवसभर तारेवरची कसरत करावी लागली. राज्यातील ३,२३७ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे.**

राज्य विधानसभेच्या २८८ जागा तर सातारा लोकसभा पोटनिवडणुकीसाठी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान सुरू होते. राज्यात ८ कोटी ९८ लाख ३९ हजार ६०० मतदार आहेत. मतदान निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली होती. सर्वत्र चोख पोलीस

उर्वरित पृष्ठ 2 वर

#### महाराष्ट्रात पुन्हा भाजप-शिवसेनाच; एक्झिट पोलचा कौल

राज्यात पुन्हा एकदा भाजप-शिवसेना महायुतीचंच सरकार येणार असल्याची चिन्हे आहेत. सर्व वृत्तसंस्था आणि वृत्तवाहिन्यांनी घेतलेल्या मतदानोत्तर चाचण्यांमध्ये भाजप-शिवसेनेचीच सत्ता येणार असल्याचा आणि काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचा सुपडा साफ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मतदानोत्तर चाचण्यांमध्ये राज्यात भाजप-शिवसेना महायुतीला २३०, काँग्रेस आघाडीला ४८ आणि इतरांना १० जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

#### तुरळक हिंसा, पावसाच्या व्यत्ययामुळे मतदानाचा टक्का घसरला

गेल्या चार आठवड्यांपासून सुरू असलेला प्रचाराचा धुरळा आणि राजकारण्यांकडून एकमेकांवर झडलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीनंतर आज मुंबईसह महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागांसाठी मतदान पार पडले. २०१४च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा मतदारांमध्ये मतदानाचा फारसा उत्साह दिसला नाही. त्यातच राज्यात काही ठिकाणी पावसाने हजेरी लावल्याने त्याचाही मतदानावर परिणाम झाला. त्यामुळे यंदा मतदानाचा टक्का घसरल्याचं दिसून येतं. दरम्यान, तुरळक घटनांचा अपवाद वगळता राज्यात शांततेत मतदान पार पडलं असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह दिग्गजांचं भवितव्य मतपेटीत बंद झालं आहे.




# नेहमीप्रमाणे मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ



मिरा भाईदर मतदार यादीमध्ये मोठया प्रमाणामध्ये घोळ असल्यामूळे अनेक वर्षे मतदान करणारी माणसे या वेळेस यादीच्या बाहेर असल्यामुळे अनेक लोक आपला मतदान अधिकार मिळवू शक्ले नाही. अनेक ठिकाणी मिरा भाईदरमध्ये घराजवळ असलेले मतदान केंद्र इतर ठिकाणी हलवण्यात आले होते. काहींची तर यादीमधून नावेच वगळण्यात आली आहेत. यामुळे जुनेजाणते मतदार वर्ग अतिशय नाराज झाले. निवडणूक आयोगाकडून कोणतीही सुचना देण्यात आली नाही अशी माहिती सर्वसामान्य जनतेने पोलिस बातमी पत्रच्या पत्रकारांना दिली.

# जिल्ह्यात ड्राय डे पाळणे बंधनकारक

**ठाणे - राज्यातील सार्वत्रिक विधानसभा निवडणूक प्रक्रिया खुल्या, मुक्त व निभय वातावरणात पार पाडण्यासाठी मतदान आणि मतमोजणीच्या दिवशी ठाणे जिल्ह्यात मद्यविक्री करण्यास मनाई करण्यात आली असून हे दोनही दिवस कोरडा दिवस म्हणून पाळण्याचे बंधनकारक आहे.**



मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार तसेच राज्य उत्पादन शुल्क आयोगाच्या नियमांनुसार सर्व अनुज्ञप्तीधारकांना सूचित केले आहे की मतदानाची वेळ संपण्यापूर्वी ४८ तास अगोदरपासून म्हणजेच १९ ऑक्टोबर २०१९ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपासून ते मतमोजणीची प्रक्रिया संपुष्टात येई पर्यंत म्हणजेच दिनांक २४ ऑक्टोबर २०१९ चा पूर्ण दिवस जिल्ह्यातील सर्व अनुज्ञप्तीधारकांना मद्य विक्रीकरिता ड्राय डे म्हणून पाळणे बंधनकारक असणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील सर्व घाऊक व किरकोळ अनुज्ञप्तीधारकांना या दरम्यानच्या काळात त्यांच्या अनुज्ञप्ती बंद ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील ज्या अनुज्ञप्ती सदरील आदेशाचे उल्लंघन करून मद्य विक्री करीत असल्याचे आढळून येतील अशा संबंधित अनुज्ञप्तीधारकाची ते धारण करत असलेली अनुज्ञप्ती कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल त्याचबरोबर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत नमूद तरतुदींन्वये संबंधित अनुज्ञप्तीधारकावर फौजदारी कारवाई देखील करण्यात येईल.

# पंजाब अँड महाराष्ट्र बँकेतच्या घोटाळ्याने जनता त्रस्त

**पंजाब अँड महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँकेवर (पीएमसी) बँकेवर रिझर्व्ह बँकेनं निर्बंध लादल्यानं लाखो खातेदार आणि ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकले आहेत. त्यामुळे लाखो खातेदार आणि ठेवीदार हवालदिल झाले आहेत. ग्राहकांना आता खात्यातून सहा महिन्यात फक्त चाळीस हजार रुपये काढता येणार आहेत. रिझर्व्ह बँकेनं अलीकडेच तसा निर्णय जाहीर केला आहे.**

बँकेवरील निर्बंधांविरोधात आणि खातेदार-ठेवीदारांसमोरील अडचणींचा पाढा वाचणारी याचिका दिल्लीतील बिजोन कुमार मिश्रा यांनी सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी घेण्यास सुप्रीम कोर्टानं नकार दिला. हायकोर्टात याचिका दाखल करण्याचे आदेश सुप्रीम कोर्टानं याचिकाकर्त्याला दिले आहेत.

सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले की, 'आम्ही कलम ३२ अंतर्गत या याचिकेवर सुनावणी करु इच्छित नाही. याचिकाकर्ते याप्रकरणी संबंधित हायकोर्टाकडे जाऊ शकतात.'

तसेच पीएमसी बँकेवर घातलेल्य निर्बंधाच्या विरोधात 'कन्झ्युमर ॲक्शन नेटवर्क' या स्वयंसेवी संस्थेने ॲड. अहमद अब्दी, ॲड. सोनल मिशाळ, ॲड. एकनाथ ढोकळे आणि टीम यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

रिझर्व्ह बँकेने प्रारंभी बँकेच्या खातेदार व ठेवीदारांना सहा महिन्यांत केवळ एक हजार




रुपये काढण्याची मुभा दिली होती. कालांतराने ही मर्यादा ४० हजार रुपयांपर्यंत वाढवण्यात आली. मात्र, तरीही कित्येक खातेदार व ठेवीदार या निर्बंधांमुळे भरडले जात असून प्रचंड ताणतणावामुळे तिघांचा यात मृत्यूही झाला आहे. हे लक्षात घेऊन याचिकादारांच्या वकिलांनी मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग व न्या. भारती डांगरे यांच्या खंडपीठाला या प्रश्नाचे गांभीर्य निदर्शनास आणले. तसेच याप्रश्नी तातडीने सुनावणी घेण्याची विनंती केली. खंडपीठाने या याचिकेच्या सुनावणीसाठी २२ ऑक्टोबरची तारीख निश्चित केली.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर भीषण अपघात; ३ जणांचा मृत्यू तर १६ जण जखमी

**मुंबई** : मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणारी खाजगी बस ही रस्त्याकडेला उभ्या असणा-या ट्रकला धडकल्याने भीषण अपघात झाला आहे. या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला असून १६ जण जखमी झाले आहेत. त्यामधील सात जणांची प्रकृती चिंताजनक आहे. हा अपघात हायवेवरील कामशेत बोगद्याजवळ पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास झाला आहे.

सयाजी पाटील, संभाजी पाटील आणि मोहन नलावडे अशी मृत्यु झालेल्या प्रवाशांची नावे आहेत. हे सर्व मुंबईहून आपल्या साता-याला मतदानासाठी जात होते. तर इतर जखमीना उपचारासाठी तळेगाव येथील पावना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. सोमवारी पहाटे ४ च्या सुमारास बस चालकाचा बसवरील ताबा सुटल्याने सर्विस रोडवर उभ्या असलेल्या ट्रकला बसने मागून धडक दिली आणि हा भीषण अपघात झाला आहे.



# खुशखबर ! आजपासून SBI सह सर्व सरकारी बँका तुमच्याकडे येवून देतील 'स्वस्त' कर्ज,

***नवी दिल्ली : वृत्तसंस्था - देशातील सर्वात मोठी बँक स्टेट बँक ऑफ इंडिया ( SBI ) यासह १८ सरकारी बँक ग्राहकांसाठी कर्ज मेळाव्याचे आयोजन करीत आहेत. हा कर्ज मेळावा २१ ऑक्टोबरपासून सुरू होणार असून २५ ऑक्टोबरपर्यत चालणार आहे. पहिल्या टप्प्यात बँकांनी ९ दिवसाच्या कर्ज मेळाव्यात ८१,७०० कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले होते.***




#### ९ दिवसाच्या ८१७०० कोटी रुपयांचे कर्ज वितरीत

उद्योजक, शेतकरी आणि इतर गरजूंना कर्ज उपलब्ध करण्यासाठी बँकांनी ९ दिवसात ८१,७०० कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले. बँकांनी १ ऑक्टोबर रोजी हा मेळावा आयोजित केला होता. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी दुसऱ्या सहामाहीत आर्थिक कामांचा मागोवा घेण्याच्या उद्देशाने सर्व सरकारी आणि खासगी बँकांना कर्ज मेळावा स्थापन करण्यास सांगितले होते.

#### ४०० जिल्ह्यांमध्ये कर्ज मेळावा

एसबीआयच्या ट्विटनुसार जवळपास सर्व सरकारी बँका या मोहिमेमध्ये भाग घेतील. ही मोहीम देशातील सुमारे ४०० जिल्ह्यात राबविली जाईल. २१ ऑक्टोबरपासून दुसरा टप्पा सुरू होईल, असे एसबीआयने ट्विट केले आहे. एसबीआयसह १८ सरकारी बँक २१ ऑक्टोबरपासून पुन्हा CustomerOutreachInitiative सुरू करणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत कर्ज शिबिरे सुरू केली जातील ज्यामध्ये ग्राहकांना सर्व प्रकारच्या कर्ज आणि इतर बँकिंग सुविधा मिळतील.

काही दिवसांपूर्वी बँकांनी यासारख्या कर्ज मेळाव्याचे आयोजन केले आणि ग्राहकांना कर्ज आणि इतर बँकिंग सुविधा उपलब्ध करुन दिल्या होत्या. #CustomerOutreachInitiative अंतर्गत, सरकार आणि बँकांचा हा मेळावा घेण्याचा उद्देश म्हणजे लोकांची आर्थिक क्षमता वाढविणे जेणेकरून मंदीच्या परिस्थितीला सामोरे जाता येईल.

#### कर्ज मेळाव्यात मिळतील या सुविधा

**कर्ज मेळाव्यामध्ये ग्राहकांना कार कर्ज, वैयक्तिक कर्ज, शेती कर्ज, दुचाकी कर्ज, एमएसएमई कर्ज आणि गृह कर्ज दिले जाईल.**



**मानवाधिकार बातमी या साप्ताहिक वृत्तपत्राच्या सहसंपादिका सौ. तेजस्वी नाईक मालंडकर यांनी नुकत्याच जन्म दिलेल्या बाळाला पोटाशी बांधून व मुलीला बोटाला धरुन एक कर्तव्य दक्ष महिला नागरिक म्हणून उत्साहपूर्ण मतदान करण्याची भुमिका बाजावली.**

# १० बोगस जामिनदार ‘गोत्यात’, बनावट कागदपत्रांव्दारे मिळवून दिला अनेकांना ‘बेल’

**पुणे : आरोपींच्या जामिनासाठी न्यायालयात बोगस जामीनदार उभा करुन थेट न्यायालयाची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पुणे गुन्हे शाखेच्या खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाने पर्दाफाश केला आहे. या टोळीतील १० जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून खोटे आधार कार्ड, रेशन कार्ड, सातबारा जप्त करण्यात आले आहे. ही टोळी बनावट कागदपत्र तयार करून जामीनदारांना न्यायालयात उभे करून ते खरे असल्याचे भासवून न्यायालयाची फसवणूक करीत होते. यामध्ये काही वकिलांचाही सहभाग असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**




पुनम बाळु कांबळे (वय २७, रा. लक्ष्मीनगर, पिंपळे गुरव), तैहसिन अर्शद जहागिरदार (वय ३८, रा. साईकृपा सोसायटी, चिखली), मन्सूर मोहमंद नायकवडी (वय ३०, रा. गणेशनगर, तळवडे, निगडी), सागर मुकुंद गायकवाड (वय २८, रा.अंकुश आनंद सोसायटी, निगडी), संतोष रघुनाथ अहिवळे (वय ३४, रा. पिंपरी), संजय साहेबराव ढावरे (वय ५०, रा. दळवीनगर, निगडी), देवानंद गोपाळराव गुट्टे (वय २८, रा. ता. गंगाखेड, जि. परभणी), सुनिल मारुती गायकवाड (वय ४०, रा. मोरवाडी, पिंपरी), विजय मारुती भारसकर (वय ४०, रा. मोरवाडी, पिंपरी), अविनाश भानुदास बनसोडे (वय २८, रा. चिंचवड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

शासकीय कार्यालयात बनावट कागदपत्रांचा वापर होत आहे, अशी बनावट कागदपत्रे बनविणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठांकडून खंडणी व अंमली विरोधी पथकाला देण्यात आले होते. त्या अनुषंगाने तपास करत असताना काही व्यक्ती व महिला शिवाजीनगर न्यायालयात बनावट सात बारा उतारा, रेशन कार्ड, आधार कार्ड बनवून चोरी, घरफोडी या सारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपांसाठी जामीन करण्यासाठी या कागदपत्राचा वापर करत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी शिवाजीनगर येथील कामगार पुतळा येथे छापा टाकून १० आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून १३ आधार कार्ड व १५ रेशन कार्ड जप्त करण्यात आली आहेत.

असे करत होते गुन्हा

टोळीतील काही जण आरोपीच्या नातेवाईकांशी संपर्क करत होते. त्यांना आरोपीला जामीन मिळवून देण्यासाठी मदत करतो, असे सांगून त्यांच्याकडून पैसे घेऊन खोटे आधार कार्ड, रेशन कार्ड, सातबारा तयार करुन घेत. त्यानंतर या जामीनदारांना न्यायालयात उभे करुन ते खरे असल्याचे भासवून न्यायालयाची फसवणूक करीत असत. यामध्ये प्रामुख्याने जो जामीनदार असे त्याच्या आधार कार्डावर फोटो असायचा. बाकी नाव, पत्ता हे बनावट टाकून त्यानंतर त्याच नावाने रेशन कार्ड तयार करीत असल्याचे तपासात समोर आले आहे.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त गुन्हे बच्चन सिंग, सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस उपनिरीक्षक निलेशकुमार महाडिक, किशोर तनपुरे, कर्मचारी अविनाश मराठे, भाऊसाहेब कोंढरे, प्रसाद मोकाशी, रमेश गरुड, पांडुरंग वांजळे, प्रमोद मगर, हनुमंत गायकवाड, सुनिल चिखले, विजय गुरव, उदय काळभोर, महेश कदम, मनोज शिंदे, सचिन कोकरे, मंगेश पवार, अमोल पिलाने, संदीप साबळे, प्रविण पडवळ, नारायण बनकर, रुपाली कर्णवर यांनी केली आहे.



# मुंबई शहरात ३२ हजार नवमतदार

**मुंबई-** मुंबई शहरांतील दहा विधानसभा मतदारसंघांत १८ ते १९ वयोगटातील ३२ हजार ४५६ नवमतदार आहेत. यात शिवडी, शीव-कोळीवाडा, भायखळात सर्वाधिक मतदार असल्याची नोंद आहे. नव्वदीच्या पुढीलही मतदारांची संख्या मोठी आहे. जवळपास २३ हजार पेक्षा जास्त या मतदारांची संख्या आहे.

१८ ते १९ या वयोगटातील नवमतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे यासाठी निवडणूक आयोगाकडून वेगवेगळे अभियान राबविले जाते. यात महाविद्यालयांमध्येही जाऊन जनजागृती करण्यात येते. त्यामुळेच नवमतदारांची संख्या ही वाढतच आहेत. मुंबई शहरात धारावी, शीव-कोळीवाडा, वडाळा, माहीम, वरळी, शिवडी, मलबार हिल, मुंबादेवी, कुलाबा मतदारसंघ येतात. या दहा विधानसभा मतदारसंघात एकूण २५ लाख ९ हजार ४५३ मतदार आहेत. यात तृतीयपंथीय मतदारांची संख्या १३२ एवढी आहे. तर पुरुष मतदार १३ लाख ७१ हजार १४० आणि महिला मतदार ११ लाख ३८ हजार १८१ आहेत.

मुंबई शहर जिल्हा निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, दहा विधानसभा मतदारसंघांत १८ ते १९ वयोगटातील ३२ हजार ४५६ मतदारांची नोंद झाली आहे. शिवडीत सर्वाधिक ३ हजार ६४६ असून शीव-कोळीवाड्यात ३ हजार ५५४ व भायखळ्यात ३ हजार ३९७ एवढे नवमतदार असल्याचे सांगण्यात आले. नव्वदीच्या पुढीलही मतदारांची संख्या मोठी आहे. ९० ते ९९ मधील २० हजार ७९७ मतदार आहेत. ९९ पुढीलही ३ हजार ५४ मतदार असून मलबार हिल, मुंबादेवी, कुलाबात या मतदारांची आघाडी आहेत.

# काँग्रेस-राष्ट्रवादीच्या नेत्यांना भाजपमध्ये घेणे हा भ्रष्टाचारच

**मुंबई-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आपले सरकार भ्रष्टाचारमुक्त असल्याचा दावा करत असले तरी गेल्या पाच वर्षांत वेगवेगळ्या मंत्र्यांचे घोटाळे बाहेर आले. ते काय होते, असा सवाल करत ज्या काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सरकारवर भ्रष्ट राजवटीचा ठपका फडणवीस ठेवतात त्याच सरकारमधील ढीगभर



नेत्यांना भाजपमध्ये घेतले हा राजकीय वर्तनातील आणि वैचारिक भ्रष्टाचारच आहे, अशी टीका मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी मुलाखतीत केली.

या सरकारने सत्तेवर येताना आणि नंतरही इतकी आश्वासने दिली की, त्या मानाने राज्याची फार काही प्रगती झाल्याचे दिसत नाही. वारेमाप घोषणा हेच या सरकारचे सर्वात मोठे काम. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीत ६५०० कोटी रुपये देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. ती घोषणा हवेतच विरली. ८९ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे जाहीर केले. पण नंतर ती संख्या निम्म्यावर आली. आताही लाखो शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत. म्हणजे एकंदर वाट्टेल ती आश्वासने देऊन ठेवल्याने अपेक्षा प्रचंड वाढल्या.

खरे तर फडणवीस सरकारने प्रसारमाध्यमांचे आभार मानायला हवेत की, त्यांच्या सरकारने-मंत्र्यांनी जो भ्रष्टाचार केला तो त्या प्रमाणात बाहेर नाही आला. हे सरकार भ्रष्टाचारमुक्त आहे तर मग चिक्की प्रकरण काय होते? सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्याशी संबंधित संस्थेचे कर्जप्रकरण, अनुदान लाटण्याचा प्रयत्न हे सारे काय होते? महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर विधानसभेत कागदपत्रांनिशी जमिनीच्या व्यवहाराबाबत आरोप झाले. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

२००९ मध्ये लोकसभा-विधानसभा आणि नंतरच्या महानगरपालिकांच्या निवडणुकांत या गर्दीचे मतांमध्ये रूपांतर झाले होते हे विसरले जाते. केवळ २०१४ व त्यानंतरच्या काळाकडे पाहू नका. प्रत्येक राजकीय पक्षाच्या वाटचालीत असा काळ येतो. मनसे त्या अवस्थेतून गेली आहे. लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारभाराला काँग्रेस आव्हान देईल, असे लोकांना वाटत होते. पण तसे झाली नाही. मनसेने लोकसभा निवडणूक लढवली नाही कारण तशी तयारी नव्हती.

# ‘बुलेट ट्रेन’ची कामे मंदगतीने

**मुंबई-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाला महाराष्ट्रात खीळ बसल्यासारखी परिस्थिती आहे. गुजरातमध्ये जमिनीचे



अधिग्रहण वेगाने होत असताना ठाणे, पालघरमधील १२०० प्रकल्पबाधितांपैकी केवळ १६७ जणांनी जमीन दिली आहे.

बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी मुंबई, गुजरातमधील १ हजार ३८० हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. यामध्ये सरकारी, खासगी, वन आणि रेल्वे जमिनीचा समावेश आहे. आतापर्यंत ६६० हेक्टर जमिनीचे अधिग्रहण झाले आहे. परंतु महाराष्ट्रात प्रकल्पाला होणारा विरोध, जमीन अधिग्रहणासाठी लागणारा वेळ आणि या वर्षी पाठोपाठ आलेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे प्रकल्पाच्या कामाला गती मिळालेली नाही. डिसेंबर २०२३ पर्यंत या बुलेट ट्रेन या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. बुलेट ट्रेन महाराष्ट्रातील ठाणे व पालघर जिल्ह्यातून जाणार आहे. पालघरमधील ७३ गावांपैकी ११ गावांतील जमिनींचे संयुक्त सर्वेक्षण बाकी आहे, तर ठाण्यातील सर्व २२ गावांमधील सर्वेक्षण पूर्ण झाले आहे, अशी माहिती नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉपरेरेशनचे व्यवस्थापकीय संचालक अचल खरे यांनी दिली.

# फराळ निर्मात्या कंपन्यांना घरगुती फराळांचे आव्हान

**मुंबई-** कारखान्यामध्ये तयार होणाऱ्या फराळापेक्षा घरगुती पद्धतीने घराघरांत तयार करून विकल्या जाणाऱ्या फराळांना ग्राहकांकडून अधिक पसंती मिळू लागल्याने कंपन्यांनी यंदाच्या वर्षी फराळाच्या दरांत वाढ केली नसल्याचे दिसत आहे. दुसरीकडे, धान्य, डाळी, साखर, तेल, तूप यांच्या किमती वाढल्याने घरगुती फराळाच्या किमतीमध्ये मात्र दहा ते पंधरा टक्क्यांची वाढ झाली आहे.

कामाच्या व्यापांमुळे फराळ बनवण्यापेक्षा तो विकत आणण्याकडे हल्ली कल असल्याने घरगुती किं वा हंगामी फराळ विक्रेत्यांनाही व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यामध्ये महिला मंडळ, बचत गट किंवा स्वतंत्र स्वरूपातही अनेक महिला फराळ विक्री करत आहेत. विशेष म्हणजे अन्नधान्याच्या किमतीत झालेली वाढ पाहता फराळ पदार्थाचे दर मात्र वाढलेले नाहीत. काही अपवाद वगळता अनेक मोठे व्यावसायिक गेल्या वर्षीच्याच दरात फराळ विकत आहेत. ‘सर्वच वस्तूंच्या किमती वाढल्याने मंदीची झळ आम्हालाही




बसली आहे; परंतु आमच्याकडे घाऊक स्वरूपात माल येत असल्याने फारशी तफावत जाणवत नाही. पदार्थाचे दर वाढवले तर अनेक ग्राहक तुटलील,’ असे दादर येथील मोठ्या फराळ व्यावसायिकांनी सांगितले. शिवाय दर वाढवले तर जे ग्राहक एक किलो पदार्थ घेत होते ते अर्धाच किलो घेतील. यात ग्राहक आणि विक्रे ते दोघांचेही नुकसान असल्याचे ते सांगतात.

गेल्या वर्षी मोठ्या व्यावसायिकांकडे भाजणी चकली, कडबोळी, तिखट शेव, चिवडा, शंकरपाळे, चिरोटे या पदार्थाचे दर साधारण ३६० ते ३८० रुपये प्रतिकिलो तर लाडू, करंजी, अनारसे आदी पदार्थ २० ते २५ रुपये प्रतिनग या दरात विकले जात होते. परंतु ग्राहकांची परिस्थिती लक्षात घेऊन याही वर्षी तेच दर कायम ठेवण्यात आले आहेत. म्हणूनच ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. शिवाय तेल-तूप कमी असलेल्या फराळाला जोगदार मागणी असल्याचे गोडबोले उद्योग समूहाचे सचिन गोडबोले यांनी सांगितले.

# गळफास लावून आत्महत्या करणाऱ्यांमध्ये ६५ टक्के तरुण

**मुंबई-** अभ्यास, नातेसंबंध आणि करियर यामुळे तरुणांमध्ये निर्माण होणाऱ्या मानसिक ताणतणावाचे प्रमाण वाढत असून गळफास लावून आत्महत्या करणाऱ्यांमध्ये जवळपास ६५ टक्के तरुण असल्याची धक्कादायक बाब मुंबई महापालिकेच्या कूपर रुग्णालयाच्या शवविच्छेदन विभागाने केलेल्या संशोधनात्मक अहवालातून निदर्शनास आली आहे. पश्चिम उपनगरांत २०१५-१८ या काळात आत्महत्या केलेल्या प्रकरणांचा अभ्यास रुग्णालयाने केला असून हा अहवाल ‘इंटरनॅशनल जर्नल ऑफ ॲडव्हान्सेस इन मेडिसीन’ या वैद्यकीय शोधपत्रिकेत नुकताच प्रसिद्ध झाला आहे.जुहू येथील कूपर रुग्णालयात आत्महत्येच्या घटनेमध्ये मृत्यू झालेल्यांचे शव विच्छेदनासाठी आणले जातात. याची तपासणी करून शवविच्छेदन अहवाल दिला जातो. २०१५-१८ या काळात रुग्णालयात एकूण ६३३८ शवांचे विच्छेदन करण्यात आले असून यामध्ये २२८ जणांनी गळफास लावून आत्महत्या केली होती. यांचा अभ्यास रुग्णालयाच्या शवविच्छेदन विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. सचिन सोनावणे यांनी केला आहे.

आत्महत्या करण्यांमध्ये गळफास लावून आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण या चार वर्षांत सरासरी ३.५९ टक्के आहे. यात प्रामुख्याने तरुणांचे प्रमाण सर्वाधिक आहे. २१ ते ३० वयोगटातील




४१.२२ टक्के आणि ३१ ते ४० वयोगटातील २४.५६ टक्के जणांनी आत्महत्या केली आहे. २१ ते ४० अशा एकूण वयोगटातील जवळपास ६५ टक्के तरुणांनी गळफास लावून आत्महत्या केल्याचे या अभ्यासात नोंदविले आहे. किशोर वयातील मुलांनीही गळफास लावून आत्महत्या केली असून यांचे प्रमाण जवळपास १६ टक्के आहे. ५० वर्षांवरील वयोगटाचे प्रमाण मात्र अत्यल्प असून १.७५ टक्के नोंदले गेले. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये मुलांचे प्रमाण मुलींच्या तुलनेत अधिक आहे. यात ६० टक्के मुले आहेत, तर ४० टक्के मुलींची नोंद आहे. विवाहितांपेक्षा अविवाहितांचे प्रमाण यामध्ये सर्वाधिक म्हणजेच ५४ टक्के असल्याचे अभ्यासात म्हटले आहे. या अभ्यासानुसार, बहुतांश आत्महत्या बंद खोलीत केलेल्या आहेत आणि त्यासाठी ओढणीचा वापर(४६ टक्के) अधिक जणांनी केला आहे. त्या खालोखाल साडी, चादर, रस्सी, केबलची वायर, लुंगी यांचा गळफास घेण्यासाठी वापर केला आहे. २१ ते ४० वयोगटातील आत्महत्या करणाऱ्यांच्या कारणांचा शोध घेतला असता यामध्ये नातेसंबंध, अभ्यासातील अडचणी, करिअरमधील ताणतणाव ही कारणे प्रामुख्याने दिसून आली आहेत. नैराश्य किंवा ताणतणावातील व्यक्ती ओळखून वेळीच उपचार, समुपदेश इत्यादी उपायांनी आत्महत्या थांबविणे शक्य आहे आणि यासाठी तातडीने पावले उचलणे गरजेचे असल्याचे यामधून अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

# शिवाजी महाराजांचा इतिहास सहावीपासून


**मुंबई-** आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या चौथीपर्यंतच्या अभ्यासक्रमात शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा समावेश नसल्यावरून वादंग झाल्यानंतर आता सहावीच्या पुस्तकांत शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा समावेश करणार असल्याचे स्पष्टीकरण आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाने गुरूवारी दिले.

गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ राज्यमंडळाचे चौथीचे इतिहासाचे पाठ्यपुस्तक शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीवर आधारित आहे. असे असताना महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या चौथीपर्यंतच्या अभ्यासक्रमात शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा समावेश नसल्याचे ‘लोकसत्ता’ने गुरूवारी उजेडात आणले. त्याबाबत मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे बुधवारी विचारणा केली असता मंडळाचे संचालक विशाल सोळंकी, सचिव विकास गरड यांनी याविषयी बोलण्यास नकार दिला होता. ‘शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा चौथीच्या पुस्तकात समावेश नाही. याबाबत मंडळाची काय भूमिका आहे?’ असा प्रश्न अभ्यासक्रम विकसन समितीच्या प्रमुख प्राची साठे यांना विचारला असता त्यांनीही कोणता प्रतिसाद दिला नव्हता. चौथीच्या पुस्तकातून शिवाजी महाराजांचा इतिहास वगळण्यावरून गुरूवारी वादंग निर्माण झाला. त्यानंतर ‘महाराष्ट्रातील प्राचीन व मध्ययुगीन काळातील समृद्ध राजसत्ता, छत्रपती शिवरायांचे कार्य, त्यांचे प्रशासन, तत्वे, नीति आणि शिवचरित्र आजही आदर्श का आहे, याची ओळख इयत्ता सहावीमध्ये स्वतंत्रपणे करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे,’ असे स्पष्टीकरण महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाकडून देण्यात आले.



# अडकलेल्या २५ हजार कोटींच्या ठेवींचे काय?

**मुंबई-** राज्यात विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर, राज्य सहकारी बँकेमधील कथित २५ हजार कोटींच्या कर्ज घोटाळ्याप्रकरणी तपास यंत्रणांची अकस्मात सक्रियता दिसून आली आणि त्यावरून बराच राजकीय धुरळाही उठला. पाठोपाठ पंजाब अँड महाराष्ट्र सहकारी अर्थात पीएमसी बँकेतील गैरव्यवहार उजेडात आले. लक्षावधी सामान्य खातेदारांचा जीव कंठाशी आणणाऱ्या, ‘पीएमसी’सह सध्या राज्यभरातील वेगवेगळ्या दोन डझनावारी नागरी सहकारी बँका आहेत. त्यात फसलेल्या सुमारे २५ हजार कोटींच्या ठेवींच्या प्रश्नावर मात्र सर्वच आघाड्यांवर दिसणाऱ्या ढिम्म शांततेत कसले ‘व्यापक हित’ दडले आहे, असा सवाल केला जात आहे.





तीन आठवड्यांपूर्वी प्रकाशात आलेला पीएमसी बँक घोटाळा आणि पाठोपाठ रिझर्व्ह बँकेने ठेवी काढण्यावर आणलेल्या निर्बंधच्या धक्क्याने धास्तावलेल्या खातेदारांपैकी तिघांनी गेल्या दोन दिवसांत जीव गमावला. निर्बंध आले तेव्हा पीएमसी बँकेतील ठेवी ११,६०० कोटी रुपयांच्या होत्या, तर तिच्यासह अन्य २५ बँकांमधील एकंदर ठेवींचे प्रमाण २५ हजार कोटींच्या घरात जाणारे आहे. या इतक्या निधीतून शिवडी-न्हावाशेवा पारबंदर सेतूसारखे दोन अथवा मेट्रोचे तीन प्रकल्प सहज साकारता येऊ शकले असते. तथापि उत्पादक वापरही नाही आणि ज्यांचा त्यावर हक्क त्या सामान्य ठेवीदारांना त्या परत मिळण्याचा मार्गही निघत नाही, अशी सहकारातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांची खंत आहे. ‘पसा-पद-सत्ता’ असा शिडीसारखा वापर करून राजकारणात बस्तान बसविता यावे यासाठीच या बँका होत्या काय, असा त्यांचा सवाल आहे.

पृष्ठ १ वरुन

## राज्यात ६०.५० टक्के मतदान

बंदोबस्त ठेवण्यात आला होता. राज्यात ९५,४७३ मुख्य तर १,१८८ सहाय्यक अशी एकूण ९६ हजार ६६१ मतदान केंद्रे उभारण्यात आले होते. चार कोटी ६८ लाख ७५ हजार, ७५० पुरुष तर चार कोटी २८ लाख ४३ हजार ६३५ असे एकूण आठ कोटी ९८ लाख ३९ हजार ६०० मतदार मतदानाचा हक्क बजावणार होते. यावेळी दोन हजार ६३४ तृतीयपंथी, तीन लाख ९६ हजार अपंग आणि एक लाख १७ हजार ५८१ सर्व्हिस मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यानंतर आता विधानसभा उम्मेदवारांना २४ तारखेची उत्सुकता लागून राहिली आहे. तसेच युती आणि आघाडी यांच्यामध्येच चुरस पहायला मिळणार असल्याचे जानकार सांगतात.

# महायुतीला १९२ ते २१६ जागा, एबीपी सी व्होटर्सच्या एक्झिट पोलचा अंदाज

महायुतीला १९२ ते २१६ जागा मिळतील असा अंदाज एबीपी सी व्होटर्सच्या एक्झिट पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे. आजच सगळ्या उमेवादारांचं भवितव्य मतपेटीत बंद झालं आहे. या एक्झिट पोलनुसार महायुतीला १९२ ते २१६ जागा मिळतील, आघाडीला ५५ ते ८१ जागा मिळतील इतर पक्षांना ४ ते २१ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

दुपारी ३ वाजण्याचा सुमारास जे मतदान झालं त्या मतदानाच्या टक्केवारीनुसार हा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महायुती २०० पार जाणार यात काहीही शंका नाही असं एबीपी सी व्होटर्स च्या एक्झिट पोलने वर्तवला आहे. या निवडणुकीसाठी सगळ्याच नेत्यांनी प्रचारासाठीचं रणमैदान गाजवलं. मात्र भाजपा आणि शिवसेना यांचीच सरशी होणार हे एक्झिट पोलचे अंदाज सांगत आहेत. राज्यात सहा वाजेपर्यंत ६०.५ टक्के मतदान झाले आहे. मतदान अद्यापही सुरु असल्याने हा टक्का वाढण्याची शक्यताही असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

**विभागवार कुणाला किती जागा?**

**पश्चिम महाराष्ट्र**

पश्चिम महाराष्ट्रातील ७० जागांपैकी ४२ जागा महायुतीला जिंकेल. २५ जागा महाआघाडीला तर इतरांना ३ जागांना

**विदर्भ**

विदर्भातील एकूण ६० जागांपैकी ५० जागांवर महायुती जिंकणार, ९ जागा महाआघाडीला तर इतरांना ३ जागा इतरांना मिळू शकतात

**उत्तर महाराष्ट्र**

उत्तर महाराष्ट्रातील ३६ पैकी २३ जागांवर महायुतीचा विजय, १२ जागा महाआघाडीकडे

**मराठवाडा**

मराठवाड्यातील ४७ जागांपैकी २६ जागा महायुतीला, १४ जागा महाआघाडीला इतरांना ६ जागा

## संपादकीय... गलबला उदंड झाला!


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

दिवाळीच्या तोंडावर होत असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची फटाकेबाजी आज संपत आहे. त्यात सत्ताधारी भारतीय जनता पक्ष-शिवसेना युतीतील सुरवातीचे आपटबार, बाहेरून येणाऱ्या सुभेदारांच्या स्वागतासाठी लावलेल्या लडी, भाजपने प्रसिद्धितंत्राच्या माध्यमातून केलेली स्मार्ट रोषणाई, विरोधकांच्या तंबूतील बऱ्याच जणांचे सादळलेले फटाके, असे सर्वसाधारण चित्र होते. पण, निवडणुकीचा हा 'महाइव्हेंट' ज्या सर्वसामान्य माणसाचा खऱ्या अर्थाने उत्सव आहे, असे मानले जाते; तो या सगळ्यांत कुठे होता? संपूर्ण प्रचारात त्याच्या जळत्या प्रश्नांवर नेमके काय मंथन झाले, हे शोधण्याचा प्रयत्न केला तर भिंगच हातात घ्यावे लागेल. दहा रुपये राइस प्लेटसारख्या योजनांचे भुईनळे उडाले. परंतु, डोळे तात्पुरते दिपण्यापुरतेच.



याचे कारण ना अशा योजनांसाठी कोठून पैसे आणणार, याचा तपशील कोणी दिला, ना राज्याच्या आर्थिक प्रश्नांचे स्वरूप चर्चिले गेले. राज्यापुढच्या प्रमुख आर्थिक, सामाजिक, प्रशासकीय प्रश्नांवरील चर्चेची, वादविवादांची घुसळण प्रचाराच्या निमित्ताने व्हावी, अशी अपेक्षा असते. पण प्रत्यक्षात भलत्याच गोष्टींना महत्त्व दिले गेले. विरोधकही ते मुद्दे पुढे आणण्यात अपयशी ठरले. अशा प्रकारच्या मंथनापेक्षा राजकीय व्यवस्थापनतंत्राचाच साऱ्या प्रचारकाळात वरचष्मा राहिला. राष्ट्रवादाचे भावनिक आवाहन ही भाजपची अगदी योजनापूर्वक केलेली प्रचार रणनीती होती, हे अगदी सुरवातीपासून स्पष्ट झाले होते. त्यांनी ती शेवटपर्यंत सोडली नाही, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दोन दिवसांतील सभांनी दाखवून दिले. जम्मू-काश्मीरबाबतचे ३७०वे कलम रद्द करण्याचा विषय या प्रचारात सातत्याने मांडून विरोधकांनी ते रद्द करून दाखवावे, अशी आव्हानात्मक भाषा वापरली गेली. अगदी अखेरच्या टप्प्यात 'संकल्पपत्र' सादर करून त्यात स्वातंत्र्यवीर सावरकर आणि महात्मा जोतिराव फुले यांना 'भारतरत्न' मिळावे, यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले गेले. हा विधानसभेच्या निवडणुकीतील प्रचाराचा मुद्दा कसा काय असू शकतो, हा प्रश्न कुणालाही पडेल. पण, असे अस्मितेचे विषय पुढे आणून विरोधकांना आपण ठरवू त्या मॅटवर खेळायला लावायचे, ही भाजपची चाल होती. ३७०वे कलम रद्द करण्यास पक्षाचा विरोध नव्हता, असे स्पष्टीकरण गुरुवारी मुंबईत माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी दिले, हे पुरेसे बोलके आहे.

एकेकाळी महाराष्ट्रात ज्या काँग्रेस पक्षाचे निर्विवाद प्रभुत्व होते, त्याची राज्यातील पडझड किती मोठ्या प्रमाणात झाली आहे, याचे दर्शन या प्रचारकाळात दिसले. पर्यायी कार्यक्रम आणि कथन देणे तर फार दूरची गोष्ट; पक्षाने प्रतिस्पर्धी चेहराच दिला नाही. विस्कळित प्रचार मोहीम, लढण्याची हरविलेली जिद्द आणि दिशाहीन झालेले कार्यकर्ते, असे काँग्रेस पक्षाचे चित्र समोर आले. वंचित बहुजन आघाडी, 'एमआयएम', महाराष्ट्र नवनिर्माण सेना आदी पक्षांनीही एखाद्या मुद्यावर वातावरण ढवळून टाकले असे झाले नाही. शिवाय काही पॉकेटपुरतेच त्यांचे अस्तित्व जाणवले. एकुणात, विरोधकांचा विचार करता प्रचारआघाडीची सारी धुरा ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याच खांद्यावर आली आणि त्यांनीही ती तेवढ्याच जिद्दीने सांभाळल्याचे दिसले. भाजप-शिवसेनेलाही पवार हेच एकमेव आव्हान समोर दिसत होते.

त्यामुळे भाजपच्या प्रचार तोफाही प्रामुख्याने त्यांच्याकडेच रोखलेल्या होत्या. 'ईडी' चौकशीचे अस्त्र वापरण्याचा सत्ताधाऱ्यांचा डावही पवारांनी ज्या कौशल्याने उधळून लावला आणि स्थानिक प्रश्न ऐरणीवर आणण्याचा अनेक सभांमधून जो प्रयत्न केला, त्यामुळे लढाईत काही काळ रंगतही निर्माण झाली; तरीही राष्ट्रवादी काँग्रेसकडील मजबूत संघटनात्मक फळीचा अभावही प्रकर्षाने जाणवला. प्रस्थापितविरोधाचा जो मुद्दा (अँटिइन्कंबन्सी) विरोधकांना एरवी लाभाचा ठरतो, तो घेण्याचा प्रभावी प्रयत्न विरोधकांकडून झालाच नाही. अर्थात, त्याचे एक कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातही सापडेल. त्यांची स्वतःची स्वच्छ प्रतिमा, प्रत्येक पेचप्रसंगाच्या वेळी त्यांनी दाखविलेले राजकीय कौशल्य आणि दिल्लीचे त्यांना लाभलेले कृपाछत्र या बळावर त्यांनी प्रस्थापितविरोधाला धार येणार नाही, याची काळजी घेतली.

## किती काळ भूतकाळ?

**भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांना एक सोय उपलब्ध होती. देशासमोरील आव्हाने आणि अडचणी याचे पाप त्याआधीच्या सुमारे दीडशे वर्षांच्या इंग्रजांच्या राजवटीच्या माथी फोडणे, ही ती सोय. भारताची प्रगती रखडली? द्या इंग्रजांना दोष. भारतात गुंतवणुकीचे गाडे अडले? लावा बोल इंग्रजी सत्तेला. प्रगतीचा वेग मंद आहे?**



दाखवा इंग्रजांकडे बोट. असे करण्याची सोय पं. नेहरू यांना होती. तसे त्यांनी केले असते तर ते रास्त नाही, पण क्षम्य ठरले असते. इतक्या वर्षांच्या परकीय राजवटीनंतर मिळालेले स्वातंत्र्य स्वीकारणे आणि जनतेच्या अपेक्षांना पुरे पडणे, हे महाकठीण म्हणता येईल असे आव्हान होते. पण ते पं. नेहरू यांनी स्वीकारले. त्यात ते किती यशस्वी झाले याबाबत दुमत असू शकेल. कारण काहींच्या मते त्यांचे आर्थिक धोरण अयोग्य होते तर अन्य काहींच्या दृष्टिकोनातून त्यांच्या आंतरराष्ट्रीय धोरणात खोट होती. अन्य काहींना काश्मीर समस्या केवळ त्यांच्यामुळे निर्माण झाली असे वाटते. तथापि या कोणत्याही टप्प्यावर पं. नेहरू यांनी एकदाही आपल्या आधीच्या ब्रिटिश सरकारला आपल्यासमोरील आव्हानांसाठी दोष दिल्याचे ऐकिवात नाही. 'काय करणार, इंग्रजांनी इतकी घाण करून ठेवली आहे की ती साफ करायला इतकी वर्षे लागतील,' असे काही उद्गार नेहरू यांनी काढल्याचे आढळत नाही. जी काही आव्हाने होती त्यांस नेहरू यांनी पूर्ण क्षमतेने तोंड दिले आणि जो काही मार्ग काढायचा तो काढला. हे आता आठवायचे कारण म्हणजे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची ताजी विधाने.

देशातील बँकिंग व्यवस्थेची वाट पंतप्रधान मनमोहन सिंग आणि रिझर्व्ह बँकेचे तत्कालीन गव्हर्नर रघुराम राजन यांनी लावली, हे निर्मला सीतारामन यांचे विधान. भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड सुरू असताना राजन रिझर्व्ह बँकेच्या सेवेत होते, असेही सीतारामन उपहासाने म्हणाल्या. या दुकलीने कारभार हाती घेण्याआधी आपल्या सरकारी बँकांवरील थकीत कर्जे ९११० कोटी रुपये इतकीच होती. पण नंतर मात्र ती २.१६ लाख कोटींपर्यंत गेली, असे त्यांचे म्हणणे. यांच्याच काळात 'फोन बँकिंग' मोठ्या प्रमाणावर सुरू होते आणि त्यामुळे बँका अधिकाधिक गाळात जात राहिल्या. त्यामुळे परिस्थिती इतकी बिघडली की सरकारला आजतागायत या बँकांचे फेरभांडवलीकरण करावे लागत आहे, हे सीतारामन यांनी नमूद केले. त्यानंतर अमेरिकी उद्योजक आदींसमोर बोलताना त्यांनी पुढील काळात आपण अधिकाधिक सुधारणा हाती घेणार असल्याचे सूचित केले. या सुधारणांचा संदर्भ काही आठवड्यांपूर्वी घटवण्यात आलेल्या कंपनी कराशी होता. या त्यांच्या भाषणामुळे काही प्रश्नही निर्माण होतात.

उदाहरणार्थ किती काळ लोटल्यावर आपल्या व्यवस्थेवर असलेला काँग्रेस राजवटीचा परिणाम पूर्णपणे धुतला जाईल? म्हणजेच आणखी किती वर्षे विद्यमान सत्ताधारी आपल्या अडचणींसाठी मागील सरकारला बोल लावतील? हे एकदा स्पष्ट झाल्यास माध्यमांनादेखील बरे पडेल. कारण त्यामुळे सरकारच्या प्रतिक्रियेसाठी थांबावे लागणार नाही. याचे कारण या सरकारला सत्तेवर येऊ न आणखी सात महिन्यांत सहा वर्षे होतील. सर्वसाधारणपणे इतक्या मोठ्या काळानंतर सरकारवरील काँग्रेस प्रभाव पुसून जायला हवा. इतक्या मोठ्या बहुमतानंतरही विद्यमान सत्ताधाऱ्यांना मागच्या सत्ताधाऱ्यांचे परिणाम नाहीसे करणे अवघड जात असेल तर आश्चर्यच म्हणायचे. ते पुसून टाकणे अजूनही शक्य झाले नसेल तर सरकारने सरळ त्यासाठी आवश्यक कालावधी जाहीर करावा, हे बरे. त्यामुळे सर्वांचीच सोय होईल. पंतप्रधानांच्या सभेसाठी झाडे तोडल्याचा आरोप झाला की लगेच 'पूर्वीही असेच होत होते' असे परस्पर माध्यमे सांगू शकतील. अर्थव्यवस्थेतील त्रुटी कोणी उघड केल्या रे केल्या की लगेच त्यास काँग्रेस कशी जबाबदार आहे हे माध्यमे सांगू शकतील. यामुळे सरकारच्या वेळेचा अपव्यय टळेल. हा झाला एक मुद्दा.

दुसरी बाब सुधारणांबाबतची. आपण आता पुन्हा आर्थिक सुधारणा करणार आहोत असे सीतारामन म्हणाल्या. त्याचे स्वागत. पण सीतारामन यांच्यावर विश्वास ठेवायचा तर.. आणि तो ठेवायलाच हवा.. त्यांच्या सरकारला सिंग आणि राजन यांनी अर्थव्यवस्थेची किती वाट लावली हे सत्तेवर आल्यावर कळले. त्यातही विशेषत: बँकांची परिस्थिती या दोघांमुळे फारच बिकट झाल्याचेही त्यांना लक्षात आले. मग प्रश्न असा की ज्या सुधारणा हाती घेणार असे सीतारामन म्हणतात त्याप्रमाणे सुधारणांना सरकारने त्याच वेळी हात का घातला नाही? आर्थिक सुधारणा रेटण्यासाठी तो उत्तम काळ होता. मोदी म्हणतील त्यावर विश्वास ठेवायला जनता त्या वेळी तयार होती आणि त्यास विरोध करण्याची क्षमता काँग्रेसमध्ये तेव्हाही नव्हती. अशा वेळी त्यांनी जर या सुधारणा रेटल्या असत्या तर आज काँग्रेसच्या नावाने बोटे मोडण्याची वेळ सीतारामन यांच्यावर येती ना. आजही सीतारामन यांच्याकडे सुधारणा म्हणून काय आहेत? तर बँकांचे विलीनीकरण. म्हणजे दोनपाच अशक्तांना एकत्र आणून त्यांना पैलवानासमोर उभे करायचे. यास सुधारणा म्हणावे काय, हा खरा प्रश्न आहे. याचे कारण म्हणजे आज बँकांसमोर आव्हान आहे ते सरकारी नियंत्रणाचे.

सरकारच्या नियंत्रणामुळे या बँकांना मोकळा श्वास घेणेही अवघड झाले आहे. मात्र ते नियंत्रण उठवण्याचा सोडा पण कमी करण्याचाही कोणताही प्रयत्न होताना दिसत नाही. या प्रयत्नांना विरोध करण्यासाठी आज समोर कोणी तगडा विरोधी पक्षदेखील नाही. आणि बँकांना स्वातंत्र्य द्यायला हवे ही शिफारसदेखील मोदी सरकारच्या काळातच नेमल्या गेलेल्या नायक समितीने केलेली. मग ती तरी स्वीकारण्याचा निर्णय या सरकारने का नाही घेतला असा प्रश्न आहे. तो जरी घेतला असता तरी एक मोठी सुधारणा केल्याचे समाधान सीतारामन यांना मिळाले असते. आता त्या वेळी सीतारामन या अर्थमंत्री नव्हत्या हे मान्य. ते पद अरुण जेटली यांच्याकडे होते. पण सरकार तर याच पक्षाचे होते, तेव्हा त्यांनी सुधारणा हाती घ्यायला हव्या होत्या. अर्थ खात्यात नाही तर निदान सीतारामन यांना संरक्षण खात्यात या सुधारणा रेटता आल्या असत्या. ते का झाले नाही, हा प्रश्न आहे.

## नालासोपाऱ्यात गुजराती, मारवाडी मतदारांची भूमिका निर्णायक

**नालासोपारा-** नालासोपारा विधानसभा मतदार संघात प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. रस्ते, वाहतूक कोंडी, अरुंद रस्ते, पाणी, जुन्या इमारतींचा प्रश्न या प्रमुख मुद्यांवरून सध्या या मतदार संघात प्रचाराचा धुराळा उडाला आहे. त्यामुळे यात कोण बाजी मारणार याकडे नालासोपारा आणि विरारकरांचे लक्ष लागले आहे. जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे १४ उमेदवार या मतदारसंघात असून सेनेचे प्रदीप शर्मा आणि बविआचे क्षीतिज ठाकूर यांच्यात चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे. यामुळेच संपूर्ण जिल्ह्यात ही प्रतिष्ठेची आणि मुख्य लढत असल्याची चर्चा आहे.

विद्यमान आ. क्षितीज ठाकूर हे या निवडणुकीत विजयाची हॅटट्रिक साधणार का, याकडे सर्वांचे लक्ष आहे. बविआचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रचारात चांगलाच जोर पकडला आहे. प्रदीप शर्मा यांनी आचारसंहिता लागल्यापासूनच प्रचाराला सुरुवात केली होती.



महायुती असल्याने त्यांना भाजप, आरपीआय आणि अन्य सहयोगी पक्षांचा पाठिंबा मिळतो आहे. दरम्यान, ही भाजपला हवी असल्याने, सुरुवातीला थोडी बंडखोरी झाली. पण आता सर्व आलबेल असल्याचे दाखवले जात आहे. मध्यंतरी ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यामुळे भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला होता. त्यामुळे भाजपाने प्रचार न करण्याची योजना आखली आहे. आता त्यांची मते सेनेला मिळतात की बविआला हे पाहणे औचित्याचे ठरणार आहे.

काही दिवसांपासून या दोन्ही उमेदवारांनी प्रचार रॅली, चौक सभा, बाईक रॅली आदींवर अधिक भर दिल्याचे दिसत आहे. आता ऑक्टोबर हीट वाढत असल्याने सकाळच्या प्रचाराऐवजी सायंकाळच्या प्रचारावर अधिकचा भर दिला जात आहे. रॅलीला सुरु वात झाल्यानंतर उमेदवारांचे कुठे औक्षण होतांना दिसत आहे, तर कुठे समस्यांचा पाढा वाचला जात आहे. नालासोपारा, विरार पूर्वेकडील भागात जुन्या इमारतींचा प्रश्न, काही भागात पाण्याची समस्या, कुठे वाहतूक कोंडी तर कुठे रस्त्यांची झालेली दुरवस्था अशा विविध मुद्यांवरून मतदार राजाही या दोन्ही उमेदवारांना आठवण करून देतांना दिसत आहे. तर शहरात विकासकामे झाली असून अजून कामांच्या योजना आखून ठेवल्या असून त्या लवकरच पूर्णत्वास येतील, असे आश्वासन क्षीतिज ठाकूर यांच्याकडून दिले जात आहे.

शहरातील जुन्या इमारतींचा प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच मेट्रो, वाहतूक कोंडी, टँकर मुक्त, स्वच्छ पाणी असे अनेक प्रश्न सोडविण्याचे आश्वासन प्रदीप शर्मा यांच्याकडून दिले जात आहे.

## आदिवासी भागातील रस्त्यांची दुर्दशा

**जव्हार-** ग्रामीण आदिवासी भागातील रस्त्यांच्या विकास कामांसाठी शासनाकडून दरवर्षी करोडो रुपये निधी उपलब्ध होतो. मात्र, आजही आदिवासी भागातील रस्त्यांची दुर्दशा कायम आहे. त्यामुळे येथील आदिवासी मतदार वैतागले असून, नेत्यांच्या प्रचाराला येणाऱ्या कार्यकर्त्यांना, आदिवासी भागातील निधी जातो कुठे? अशी विचारणा केली जात आहे.

जव्हार तालुक्यात १ लाख ६० हजार लोकसंख्या असून, १०९ महसूल गावे आणि २४५ पाडे आहेत. मात्र या तालुक्याला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे न झाल्याने मतदारांना दिलेली आश्वासने हवेतच विरली आहेत. त्यामुळे आदिवासी मतदार यावर्षी कोणाला कौल देणार हे अनुत्तरीतच आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती बांधकाम विभाग या विभागांकडून ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी दरवर्षी करोडो रुपये येत आहेत. मात्र, तरीही तालुक्यातील गावांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्यांची परिस्थिती 'जैसे थे'च आहे.



जव्हार ते दाभोसा, सिल्वासा - गुजरात रस्त्याचे काम संथगतीने सुरु आहे. त्यातच पावसाळ्यात ठिकठिकाणी रस्ता वाहून गेल्याने दुरवस्था झाली आहे. जव्हार - वाडा - विक्र मगड रस्ता हे तालुक्यातून जाणारे महत्त्वाचे रस्ते आहेत. आदिवासी भागातील देहेरे - मेढा रस्ता, केळीचापाडा - साकूर, झाप रस्ता, जामसर - सारसून, ढाढरी रस्ता, या ग्रामीण भागातील महत्त्वाच्या रस्त्यांची देखील दुर्दशा झालेली दिसते. दरवर्षी ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी लाखोंचा निधी खर्च होऊनही रस्त्यांची अवस्था बिकट कशी, असा प्रश्न नागरिकांना भेडसावतो आहे.

तालुक्यातील काही रस्त्यांचे डांबरीकरण, मजबुतीकरण किंवा रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे कामे झाली आहेत. परंतु हे डांबरीकरण करण्यात आलेले रस्ते आणि बुजविण्यात आलेले खड्डे वर्षभरातच उखडून निघाल्याचे चित्र दिसते आहे. खड्ड्यांच्या रस्त्यांमुळे वाहन चालक आणि नागरिक वैतागले आहेत. जव्हार शहरातील मुख्य रस्त्यांची पूर्णपणे चाळण झाली असून, रस्त्यावर सर्वत्र खडी पसरली आहे. यामुळे अपघात होत आहेत. रस्त्यात मोठमोठे खड्डे पडले असून प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होते आहे.


## सनई चौघड्यांच्या सुरात मतदारांचे स्वागत

### सखी मतदान केंद्रावर उत्साहात मतदान

**ठाणे - विद्या प्रसारक मंडळाचा विस्तीर्ण परिसर ...परिसराच्या मध्यभागी संवादिनी ...सनई-चौघड्याचा मंजुळ स्वर...नक्षीदार काढलेली रांगोळीची आरस...सजावट केलेला मुख्य प्रवेश द्वार ....प्रत्येक्ष मतदान केंद्रावर फुग्याची केलेली गुलाबी सजावट आणि मतदान केंद्रावर कार्यरत असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा फेटा बांधलेला पेहराव .... असं आल्हाददायक वातावरण सखी मतदान केंद्रावर पाहायला मिळालं.**

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा क्षेत्रासाठी सोमवारी २१ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या मतदाना दिवशी जिल्ह्यातील ३० सखी मतदान केंद्रावर असे वातावरण पाहायला मिळाले. या संपूर्ण मतदान केंद्राची जबाबदारी महिला अधिकारी व कर्मचारी यांनी पार पाडली.

या केंद्रावर उपस्थित असणाऱ्या निवडणुक अधिकाऱ्यांच्या हस्ते मतदारांना तुळशीचे रोप वाटप करून



स्वागत करण्यात आले. त्यामुळे या केंद्रावर येणाऱ्या प्रत्येक मतदारांनी उत्साही...आनंदाने मताधिकारी बजावला. भारत निवडणुक आयोगाच्या सूचनेनुसार सखी मतदान केंद्राची स्थापना केली जाते. या मतदान केंद्रावर काम करण्यासाठी संपूर्ण महिला-अधिकारी-कर्मचारी कार्यरत असतात.

## औद्योगिक पट्ट्यात मंदीचा धूर

**वाडा-** जागतिक मंदीचा जोरदार फटका वाडा तालुक्यातील कारखानदारांना बसत असून मंदीमुळे उद्योजकांचे कंबरडे मोडत आहे. वाडा औद्योगिक पट्ट्यातील एकेक कारखाना मंदीमुळे बंद होऊन हजारो कामगार बेकार होत आहेत. तसेच कारखान्यांचे उत्पादन निम्म्यावर आले असून कामगार कपातही सुरू आहे. ओव्हरटाइम देणेही बंद केल्याने कामगारांतही नाराजीचा सूर आहे.

वाडा तालुक्यातील मागास आणि आदिवासी भागाचा विकास व्हावा, गरीब आणि आदिवासींना रोजगार मिळावा या उद्देशाने डी प्लस झोन ही योजना तत्कालीन सरकारने १९९२ मध्ये जारी केली. त्यावेळी उद्योगांना १३ वर्षे विक्री करात सूट, आयकरात सूट, उद्योजक शेतकरी नसला तरी जमीन नावावर होणे, वीज बिलात सूट तर प्रकल्प खर्चाच्या ३० टक्क्यांपर्यंत सरकारकडून रोख सबसिडी आणि इतर अनेक सवलती देण्यात आल्या. त्यामुळे उद्योजकांनी आपला मोर्चा वाड्याकडे वळवला. हजारो कारखानदारांनी येथे आपले बस्तान बसवले. वाड्यात आलेले कारखाने हे प्लास्टिक पिशव्या (कॅरी बॅग) पासून ते कपड्यांपर्यंत, टाचणीपासून ते भांड्यांपर्यंत,



मोटारगाड्यांचे पार्ट, विमानाचे भाग, शीतपेये, टी.व्ही., फ्रीज, लोखंड उत्पादन करणारे आहेत.

वाड्यात लोखंडाचे उत्पादन करणाऱ्या ४० टक्के कंपन्या असून आशिया खंडातील लोखंडाची सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून वाड्याचा उल्लेख केला जातो. मात्र अलीकडच्या काळात सरकारने सबसिडी बंद करून विजेचे दर भरमसाठ वाढवल्याने लोखंडाची ही बाजारपेठ नष्ट होते की काय, असा प्रश्न भेडसावतो आहे. जागतिक मंदीचा फटका सध्या वाडा औद्योगिक पट्ट्यात बसत असून अनेक कारखाने यामुळे बंद झाले आहेत तर काही होत आहेत. खरीवली येथे समर्थ एअरकॉन या कंपनीत २०० कामगार काम करीत आहेत. येथे फॅब्रिकेशनचे काम केले जाते. २४ तास तीनही शिफ्टमध्ये या कंपनीचे कामकाज चालायचे. मात्र या मंदीमुळे एका शिफ्टमध्येच ही कंपनी चालवली जाते. या कंपनीतील ५० टक्के काम कमी झाल्याची माहिती मिळाली. वैष्णव इस्पात ही कंपनी वसुरी येथे असून येथे लोखंडाचे उत्पादन केले जात होते. कंपनीत सुमारे ५०० च्या आसपास कामगार काम करीत होते. मात्र अवाजवी वीज बील आणि मंदी यामुळे ही कंपनी काही दिवसांपूर्वीच बंद करण्यात आली आहे.

## सेना बालेकिल्ला राखणार का?

**पालघर–** पालघर विधानसभा मतदार संघात प्रचार अंतिम टप्प्यात आला असला तरी शिवसेनेच्या या बालेकिल्ल्यात डहाणू प्राधिकरण हटवणे आणि वाढवण बंदरा विरोधातील तरुणांनी स्वयंस्फूर्तीने उगारलेले मतदानाविरोधातील बहिष्काराचे अस्त्र सेना उमेदवार श्रीनिवास वनगा यांचे मताधिक्य घटवू शकते. मासेमारी हद्द, पर्ससीन-एलईडी, मच्छीमारांच्या घरांच्या जमिनीचे सातबारे, एमआयडीसीच्या प्रदूषित पाण्याची पाईपलाईन, पानेरी प्रदूषण, आदी प्रमुख मुद्द्यांवर विरोधी उमेदवार सत्ताधाऱ्यांच्या विरोधात प्रचारात आक्रमक बनत आहेत. या मतदारसंघात पाच उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी खरी लढत सेनेचे श्रीनिवास वनगा आणि काँग्रेस किंवा वंचित बहुजन आघाडी उमेदवारा मध्येच होणार आहे.

पालघरमध्ये विद्यमान आमदार अमित घोडा यांना डच्चू देत शिवसेनेकडून श्रीनिवास वनगा यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आपल्यावर अन्याय झाल्याचे सांगून अमित घोडा यांनी बंडखोरी करीत राष्ट्रवादीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या उमेदवारीला बविआचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांनी दिलेल्या ताकदीने सेनेच्या गटात अस्वस्थता पसरली होती. त्यामुळे घोडा यांना



ठाणे, मातोश्री अशी वारी करून आणल्यानंतर घोडा यांनी आपली उमेदवारी मागे घेतली होती. या उमेदवारी मागे घेण्याच्या नाट्यानंतर उद्धव ठाकरे यांनी अमित घोडा यांच्यावर अन्याय होणार नाही याची काळजी मी घेईन, त्याने माझ्याकडे काही मागितली नाही पण मी त्याला काहीतरी नक्कीच देईन असे सांगुन त्याची बंडखोरी शमवून टाकली आहे. त्यामुळे त्याने श्रीनिवास च्या प्रचाराला सुरु वातही केली आहे.

# इमानदारांच्या पैशांवर टाच येऊ देणार नाही, बेईमानांवर कारवाई होणारच

**मुंबई- इमानदारांच्या पैशांवर टाच येऊ देणार नाही तर बेईमानांवर कारवाई होण्यापासून कुठलीच ताकद थांबवू शकत नाही, आता जर कोणी चूक केली तर त्याला शिक्षा मिळणारच, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. मुंबईतील बीकेसीमध्ये आयोजित महायुतीच्या सभेत ते बोलत होते. यावेळी मंचावर शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीचे नेते उपस्थित होते. यावेळी मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीत करत पुन्हा उद्धव ठाकरे यांचा उल्लेख 'माझे लहान बंधू' असा केला.**

यावेळी मोदी म्हणाले की, मागच्या पाच वर्षांत केंद्र किंवा राज्यात भ्रष्टाचाराचा एकही डाग आमच्यावर लागला नाही. भाजपच्या मुळात जनभागीदारी आहे. गरिबांना सशक्त बनवण्यासाठी अनेक प्रयत्न आम्ही केले आहेत, असे मोदी म्हणाले. घाडीच्या काळात मुंबईची अवस्था कशी होती ते आठवा? आघाडीने तर आदर्श घोटाळा करुन लष्करातल्या जवानांच्या घराबाबतही घोटाळा केला असाही आरोप नरेंद्र मोदींनी केला.

मोदी पुढे म्हणाले की, मागच्या सरकारच्या काळात मेट्रोच्या कामाची गती कासवालाही लाज वाटेल अशी होती. मुंबईत घर घेण्यासाठी गुंतवणूक करणाऱ्यांना रियल इस्टेट माफियांपासून कुठलंच संरक्षण नव्हतं. रेरा कायदा आणून घरमालकांचा आवाज बुलंद केला. लाखोंना परवडणारी घरं दिली तर लाखोंना घरं देणार आहोत. घरकर्जाच्या व्याजदरात सवलत दिली, ज्यामुळे चार ते पाच लाखांचा दिलासा मिळतो, असेही मोदी म्हणाले.

लोकांच्या पैशांवर डल्ला मारणारे काही तिहार जेलमध्ये आहेत तर काही इथल्या जेलमध्ये आहेत. आता तर साफसफाईची सुरुवात झालीय, अजून खूप वेगाने काम होणार आहे. इमानदारांच्या पैशांवर कोणतीही टाच येऊ देणार नाही तर बेईमानांवर कारवाई होण्यापासून कुठलीच ताकद थांबवू शकत नाही, असेही मोदी म्हणाले. मुंबईशी आमचं गर्वाचं नातं आहे. कारण आमच्या पक्षाचा जन्म या मुंबईच्या धर्तीवर झाला. मुंबईच्या धर्तीची मोठी महानता आहे. मुंबईत ह्युमन कॅपिटल, व्हेंचर कॅपिटल आहे. जगभरातील गुंतवणूकदारांना मुंबईत यायचं आहे, असेही ते म्हणाले.

पाच वर्षांपूर्वी मुंबईतल्या विकासापेक्षा मंत्रालयातील 'इंफ्रास्ट्रक्चर'वर जास्त विचार व्हायचा. मंत्रालयात कुणाला मुख्यमंत्री करायचं, कुणाला खाली खेचायचं अशी कामं काँग्रेस-राष्ट्रवादीच्या काळात व्हायची. मात्र आम्ही लोकांसाठी कामं केली. त्याचमुळं पन्नास वर्षांनंतर महाराष्ट्राला सलग पाच वर्षे मुख्यमंत्री लाभला. हे तुमच्यामुळे शक्य झालं. तुम्ही स्थैर्य निवडलं, असे मोदी म्हणाले.



## शरद पवारांचे सर्व दात पडले, फक्त 'सुळे' शिल्लक

**खेड- शिवसेना नेते आणि माजी केंद्रीय अवजड उद्योग मंत्री अनंत गीते यांनी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याव घणाघाती टीका केली आहे. शरद पवारांचे सर्व दात पडले आहेत फक्त 'सुळे' शिल्लक आहेत, अशी अवस्था राष्ट्रवादी पक्षाची झाली असल्याची टीका अनंत गीते यांनी केली आहे.**

खेडमध्ये दापोली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युतीचे उमेदवार योगेश कदम यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या प्रचारसभेला अनंत गीते यांनी केली आहे. राष्ट्रवादी पक्षावर सर्व स्तरातून टीका होतेय या टीकांना उत्तर देण्यासाठी शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे पुढे सरसावल्या आहेत. या पार्श्वभूमीवर माध्यमांवर आणि सोशल मीडियावर असे विडंबन केले जात आहे. पुढे ते म्हणाले, केंद्राप्रमाणे महाराष्ट्रात देखील विरोधीपक्ष नसेल एवढ्या जागा युतीला मिळतील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई येथे धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत




शरद पवार यांनी कलम ३७० वरून नरेंद्र मोदी यांचा समाचार घेतला तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे 'रेवडी' पैलवान असून रेवड्यांवरची कुस्ती आम्ही खेळत नाही, असा टोला शरद पवार यांनी यावेळी लगावला.

यावेळी व्यासपीठावर विरोधीपक्ष नेते धनंजय मुंडे, केज राष्ट्रवादीचे उमेदवार पृथ्वीराज साठे, जिल्हा अध्यक्ष बजरंग सोनवणे, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष राजकिशोर पापा मोदी यांची उपस्थित होते. शरद पवार यांनी भाजपवर हल्ला चढवला. भाजप प्रत्येक प्रश्नाला ३७० सांगतात सगळ्या प्रश्नाला उत्तर फक्त ३७० असें सांगतात. मूलभूत प्रश्न बाजूला आहे. शेतकरी, बेरोजगार, उद्योग बंद पाडले आणि सांगतात ३७० चा निर्णय म्हणे, ५६ इंच छातीने घेतला ते कोण निर्णय घेणारे हा निर्णय पार्लमेंटने घेतला असे म्हणत कलम ३७० चा समाचार घेतला. महाराष्ट्रात सध्या सगळीकडे चर्चा परळीची देशाचे पंतप्रधान आले. गुरूवारी परळीत काय बोलायचं तें बोलले पण परळीची जागा जिंकायची तर पंतप्रधानांशिवाय दुसरे गत्यंतर नाही. या निष्कर्शापर्यंत भाजप आली.

## यावेळी महाराष्ट्रात चमत्कार घडेल, जनतेचा मूड वेगळा आहे

**मुंबई-** विधानसभा निवडणुकीत यावेळी महाराष्ट्रात चमत्कार घडेल, जनतेचा मूड वेगळा आहे. त्यामुळे राज्यात सत्ता परिवर्तन अटळ आहे, असा दावा राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे. भाजपला कळून चुकले आहे, हे राज्य आपल्या हातातून जाणार आहे. त्यामुळे देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री इथे येऊन सभा घेतात. आपले मुख्यमंत्री प्रत्येक मतदारसंघात जात आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आले, इतर केंद्रीय मंत्री आलेत ते इथे पर्यटनासाठी फिरतायत का? यांना खात्री झाली आहे. हे राज्य आपल्या हातातून जाईल की काय, लोकांचा मूड आपल्याविरोधात आहे, हे त्यांच्या लक्षात आले आहे, असे प्रवार म्हणालेत.

माझे राज्य आहे, त्यामुळे पाया अधिक मजबूत करण्यासाठी मी



अधिक लक्ष केंद्रीत करत आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस आघाडाची प्रचारात चांगले काम करत आहेत. काँग्रेसचे नेते ताकदीने लढत आहेत. मात्र, - सत्तेचा गैरवापर कसा करावा, विरोधकांविरुद्ध सूडाचे राजकारण कसे करावे हे आजच्या राज्यकर्त्यांनी दाखवले आहे, अशी टीका पवार यांनी यावेळी भाजप आणि शिवसेना सरकारवर केली.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत भ्रष्टाचाराचा आरोप करण्यात येत आहे. ईडीकडून चौकशी सुरु आहे. मात्र, मला पूर्ण खात्री आहे किती चौकशी करा काही हाताला लागणार नाही. दाऊदचा हस्तक इक्बाल मिर्चीच्या पत्नीशी कोणतेही व्यवहार झालेले नाहीत तर त्याचे स्पष्टीकरण का द्यायचे? सत्तेचा गैरवापर कसा करावा, विरोधकांविरुद्ध सूडाचे राजकारण कसे करावे हे आजच्या राज्यकर्त्यांनी दाखवले आहे.

मला पूर्ण खात्री आहे किती चौकशी करा काही हाताला लागणार नाही. ती जागा प्रफुल पटेल ८ ते १० वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांनी घेतली आहे. त्यांचे वडील मोठे उद्योजक होते, तो वारसा त्यांनी पुढे चालवला आहे. हे आरोप केले जातात त्यात काही तथ्य नाही. मी राज्य बँकेत कर्ज देण्यासाठी दिलेली शिफारस पत्र दाखवा, मलाही हे कळले पाहिजे.

## 'आता हीच वेळ; स्वातंत्र्यवीर सावरकरांना १०० टक्के मिळणार भारतरत्न'

**मुंबई-** भाजपने पक्षाच्या जाहीरनाम्यात स्वातंत्र्यवीर सावरकर आणि महात्मा फुले यांना भारतरत्न देण्याचा उल्लेख केला आहे. हा आता निवडणूक प्रचारात प्रमुख मुद्दा बनला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना भारतरत्न सन्मान



१०० टक्के देण्याविषयी शक्यता जाहीर केली आहे. आता स्वातंत्र्यवीर सावरकरांना योग्य सन्मान देण्याची वेळ आली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना गडकरी यांनी म्हटले आहे की, सावरकर केसमध्ये कोर्टाने स्पष्टपणे निर्णय दिला आहे. यावरून इतिहास देखील स्पष्ट आहे. महात्मा गांधींच्या हत्या प्रकरणी काँग्रेसकडून केलेले आरोप निराधार आणि इतिहासाच्या विरोधात आहेत. काँग्रेस नेहमीच लोकांची दिशाभूल करत आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपले संपूर्ण आयुष्य देशासाठी अर्पण केले. ते सर्वांचे प्रेरणास्त्रोत आहेत. जे सावरकर यांच्या विरोधात वक्तव्य करत आहेत; त्यांनी इतिहास आणि साहित्य वाचलेले नाही. हे खूप दुर्भाग्यपूर्ण आहे. सावरकर यांना देशाचा सर्वोच्च सन्मान देणे हा आमच्यासाठी निवडणुकीचा मुद्दा नाही. ही अनेक दिवसांपासूनची मागणी आहे.

## १६ वर्षात सोन्याच्या किंमतीत सहापटीपेक्षा जास्त वाढ, सेन्सेक्सने दिला ७ पट परतावा

**नवी दिल्ली-** या वर्षी धनत्रयोदशी २५ ऑक्टोबरला येत आहे. त्यासाठी आता खूप कमी दिवस बाकी आहेत. या शुभमुहूर्तावर लाखो भारतीय व्यक्तिगत उपयोगासाठी किंवा गुंतवणुकीसाठी सोन्याची खरेदी करतात. गेल्या १६ वर्षांचा विचार केला तर सोन्याच्या किमतीमध्ये सहापटीपेक्षा जास्त वाढ झाली आहे. वर्ष २००४ मध्ये सोन्याची किंमत ५,८५० रुपये प्रती १० ग्रॅम होती. आता ती वाढून ३९,००० रुपयांच्या आसपास आहे. हा विचार केला तर जर एखाद्या व्यक्तीने २००४ मध्ये १.५ लाख रुपये सोन्यामध्ये गुंतवले असतील तर त्या काळी त्याने २५६.४ ग्रॅम सोने खरेदी केले असेल. आज हे २५६.४ ग्रॅम सोने विकले तर १० लाख रुपयांपेक्षा जास्त मिळू शकतात. गेल्या महिन्यात प्रती १० ग्रॅम सोन्याची किंमत ४०,००० रुपयांच्या विक्रमी पातळीवर गेली होती. गुरुवारी सणासुदीच्या



मागणीमुळे दिल्लीत सोन्याची किंमत १०५ रुपयांनी कमी होऊन प्रती १० ग्रॅमसाठी ३८,९८५ रुपयांवर आली.गुंतवणुकीच्या अन्य पर्यायांचा विचार केला तर या काळात बीएसई सेन्सेक्सने ७.९२ टक्के परतावा दिला आहे. परंतु शेअर्समधील गुंतवणुकीबरोबर बाजारातील जोखीम असते. पारंपरिक गुंतवणूकदार सोन्याकडे जास्त आकर्षित होतात. कारण त्यांना अन्य पर्यायांच्या तुलनेत सोन्यातील सुरक्षा, लिक्विडिटीबरोबरच चांगला परतावा मिळण्याचा विश्वास जास्त असतो. गेल्या १६ वर्षांतील अनुभव बघितला तर परतावा देण्यामध्ये सोन्याने चांगली कामगिरी केली आहे. एका ठरावीक कालावधीनंतर महागाईवर मात करण्याची सोन्याची क्षमता असते. त्याच्या किमतीमध्ये महागाईच्या दराने वाढ होते. दुसरी गोष्ट आपल्या गुंतवणूक पोर्टफोलिओतील शेअर्सच्या गुंतवणुकीचा समतोल साधण्यासाठी सोन्यात गुंतवणूक करणे चांगले समजले जाते.

## शेवटच्या टप्प्यातील प्रचारावर पाणी!

**सोलापूर-** विधानसभेच्या निवडणुकीसाठी शेवटच्या दोन रात्री महत्त्वाच्या मानल्या जातात. आज, शनिवारी अधिकृत प्रचार संपणार असला तरी यानंतरच छुप्या प्रचाराला गती येते. अर्थकारणाच्या वावड्या उठल्या जातात आणि जागते रहोचा पहारा यंत्रणेसोबत उमेदवारांना द्यावा लागतो. प्रचाराच्या या शेवटच्या टप्प्यावर मात्र शुक्रवारी सुरु झालेल्या संततधारेने पाणी पडले. अजून दोन दिवस पावसाचे सांगितल्याने उमेदवार सुखावले असले तरी अनेकांची पदरी निराशा पडणार आहे. कमी कालावधी यातच निवडणूक आयोगाचे अनेक निर्बंध उमेदवारांना सुखकारक ठरत आहेत. जेवढा कमी वेळ तेवढा पैसा वाचतो हे गणित आता चांगले रुळले असल्याने पहिला टप्पा उमेदवारी घोषित करण्यात जातो. यावेळी तर शेवटच्या दोन दिवसांपर्यंत कोण कोणत्या पक्षाकडून लढेल हेच चित्र स्पष्ट होत नव्हते. प्रचारातील पहिली रंगत उरली नाही. अनेक भागापर्यंत उमेदवार पोहोचले नाहीत. प्रचारसभांचे पडघम काही ठिकाणीच वाजले. रॅली, सभा यातून उडणारा धुरळा यावेळी तेवढ्या प्रमाणात उडाला नाही. मतदारांनाही शेतातील कामांनी यात रुची दाखवायला वेळ दिला नाही.

## विष्णूचा दहावा अवतार सांगत क्लार्क झाला अब्जाधीश, आयकर विभागाने जप्त केली ९३ कोटींची रोकड

**बेंगळुरु-** आयकर विभागाने एका कथित आध्यात्मिक गुरूच्या आश्रमावर छापा टाकला असून यात मोठ्या प्रमाणावर रोकड जप्त करण्यात आली आहे. कथित गुरुचे नाव कल्की भगवान असं



आहे. त्यांनी सुरुवातीला लाइफ इन्शुरन्सचा क्लार्क म्हणून काम करायला सुरुवात केली होती. आता स्वत:ला भगवान विष्णूचा १० वा अवतार असल्याचं सांगत आहेत. शुक्रवारी आयकर विभागाने बेंगळुरू येथील आश्रमावर छापा मारला तेव्हा तब्बल ९३ कोटी रुपयांची रोकड सापडली आहे. याशिवाय दुसऱ्या आश्रमांवर मारलेल्या छाप्यात ४०९ कोटी रुपयांची संपत्ती असल्याचंही समोर आलं आहे.

आयकर विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कल्की आणि त्यांचा मुलगा कृष्णा यांच्या आंध्र प्रदेश, तामिळनाडुसह ४० ठिकाणी छापा मारण्यात आला. आयकर विभागानं एकाच वेळी चेन्नई, हैदराबाद, बेंगळुरू या ठिकाणी छापा मारला.

कल्कीने त्यांच्या समुहाची स्थापना १९८० मध्ये केली होती. त्यानंतर याचा विस्तार झाला. यामध्ये रिअल इस्टेट, कन्स्ट्रक्शन आणि क्रीडा क्षेत्राचा समावेश आहे. फक्त भारतातच नाही तर परदेशातही समुहाने पाय पसरले आहेत. ट्रस्टच्यावतीने समूह दर्शन आणि अध्यात्म यामध्ये कार्यक्रम आणि ट्रेनिंग प्रोग्रॅम असायचा. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून परदेशी नागरीकांनाही भूरळ पाडली. यामुळे परदेशी चलनही मोठ्या प्रमाणावर मिळालं. ट्रस्टकडून देण्यात येणाऱ्या पावत्यांमध्ये हेराफेरी केली जात होती. ते पैसे रिअल इस्टेटमध्ये वापरले जात होते. याच्या जोरावर आंध्र प्रदेश आणि तामिळनाडुत मोठ्या प्रमाणावर जमीनीची खरेदी केली. आयकर विभागाने टाकलेल्या छाप्यात अनेक गैरव्यवहार समोर आले आहेत.

## चिदंबरम, पिता-पुत्रासह १५ जणांवर आरोपपत्र

आयएनएक्स मीडिया घोटाळाप्रकरणी सीबीआयने माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम, त्यांचा मुलगा कार्ती, पीटर मुखर्जीसह १५ जणांवर आरोपपत्र दाखल केले. घोटाळ्यातील आरोपी व नंतर माफीचा साक्षीदार बनलेली इंद्राणी मुखर्जीचेही यात नाव आहे. न्यायालयाने गुरुवारी चिदंबरम यांना २४ ऑक्टोबरपर्यंत ईडीच्या कोठडीत पाठवले आहे. सीबीआयने विशेष न्यायाधीश लाल सिंग यांच्यापुढे भ्रष्टाचारविरोधी कायदा तसेच विविध भादंवि कलमांतर्गत आरोपपत्र दाखल केले. आरोपींमध्ये चार्टर्ड अकाऊंटंट एस. भास्करमण, नीती आयोगाचे माजी सीईओ सिंधूश्री



खुल्लर, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे माजी सचिव अनुप के. पुजारी, प्रबोध सक्सेना, रबिंद्र प्रसाद आदींचा समावेश आहे. तसेच अर्थमंत्रालयातील चार माजी अधिकारीही आहेत. याप्रकरणी सोमवारी विशेष न्यायाधीश अजय कुमार कुहर यांच्यापुढे सुनावणी होणार आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर चिदंबरम यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र न्यायमूर्ती आर. बनुमथी यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने त्यांच्या अर्जावरील निर्णय राखून ठेवला. सीबीआयच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी त्यांच्या अर्जाला विरोध केला.

सर्व आरोपींनी आयएनएक्स मीडिया घोटाळा करून सरकारी तिजोरीचे प्रचंड नुकसान केले. सीबीआयने भादंवि कलम १२०(ब), ४२०, ४६८ आणि ४७१ तसेच भ्रष्टाचारविरोधी कायद्याच्या कलम ९, १३(२) आणि १३(१)(ड) अन्वये आरोप केले आहेत.

## प्रफुल्ल पटेल यांनीच एअर इंडियाची वाट लावली!

**नवी दिल्ली-** एअर इंडिया कंपनीची तत्कालीन केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांनीच वाट लावली, असा सनसनाटी आरोप केंद्रीय पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी केला. तब्बल १८ हजार कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या या कंपनीने ६० हजार कोटी रुपयांची विमाने खरेदी केली, परंतु, त्याचा काहीएक उपयोग झाला नाही, असेही जावडेकर म्हणाले. पंजाब महाराष्ट्र बँकेतील गैरव्यवहार प्रकरणातही पटेल यांचा सहभाग होता का याचीही चौकशी करण्याची गरज असल्याचे जावडेकर म्हणाले.



एअर इंडियाचे मार्गही खासगी विमान कंपन्यांना विकण्यात आले. म्हणजेच त्यातही घोटाळा केला, असेही ते म्हणाले. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना फोन बँकिंग सुरू झाले. एका फोनवरून कोट्यवधींची कर्जे मंजूर केली जायची. हे लक्षात घेता पीएमसी बँकेत झालेल्या व्यवहारांमधील प्रफुल्ल पटेल यांचा सहभाग तपासण्याची मागणीही जावडेकर यांनी यावेळी केली.

JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com

Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Email : scsocialrightsfoundation@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH/2019/0224064

R.N.I.no. MAHAR/2014/57121
मानवाधिकार बातमी
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

Annapurna Caterers

R.N.I.no.MAHAR/2014/55402
महानगर समाचार
आपले स्वातंत्र आपले विचार
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474

SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)

R.N.I. No. MAHMAR/2014/60133
पोलिस बातमी पत्र

आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)